| | |
|---|---|
| **दाखल तारीख** | ०२/०६/२०१७ |
| **नोंदणी तारीख** | ०२/०६/२०१७ |
| **न्यायनिर्णय ता.** | २४/०७/२०२६ |
| **कालावधी** | वर्ष. महिने. दिवस<br>०९ ०१ २२ |

**निशाणी क्र.३७/ब**

भाग अ

| | |
|---|---|
| CNR NO.<br>MHAM090029902016 | **न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्र.३, चांदूर बाजार,<br>जि. अमरावती यांचे न्यायालयात.<br>(पिठासीन अधिकारी एच.एस. सोनार.)**<br><br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५२४/२०१७**<br><br>**शिरजगाव कसबा पो. स्टे. गुन्हा रजिस्टर क्र. १४१/२०१७** |
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र शासन**<br>द्वारा पोलिस स्टेशन ठाणेदार,<br>पोलिस स्टेशन शिरजगाव कसबा,<br>ता. चांदुरबाजार, जि. अमरावती. |
| **प्रतिनिधीत्व** | श्रीमती प्रतिभा खंडारे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | **१. प्रेमिलाबाई रणजितसिंग परिहार,**<br>वय – ७० वर्ष , व्यवसाय – मजुरी,<br><br>**२. दिपक रणजितसिंग परिहार,**<br>वय – ४० वर्ष , व्यवसाय – मजुरी,<br>दो.रा.खरपी, ता. चांदुरबाजार, जि. अमरावती |
| **प्रतिनिधीत्व** | विधिज्ञ श्री. एन.एच.पाटील. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | ०५/०५/२०१७ |
| खबर/फिर्याद नोंदणीचा दिनांक | : | ०६/०५/२०१७ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | : | ०२/०६/२०१७ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप ठेवण्याचा दिनांक | : | ११/०५/२०२३ |
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | : | ०८/०९/२०२३ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवण्यात आल्याचा दिनांक | : | ०५/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | २४/०७/२०२६ |
| शिक्षा ठोठावण्याचा आदेशाचा दिनांक/ जर काही | : | काही नाही |

## <u>आरोपीचा तपशील</u>

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | सोडल्याचा दिनांक | ठेवलेले आरोप | निर्दोष/ दोषी | दिलेली शिक्षा | संपरीक्षा चालू असतांना आरोपींना स्थानबध्द करुन ठेवल्याचा कालावधी – फौ.प्र.सं. चे कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br><br>२. | प्रेमिलाबाई रणजितसिंग परिहार<br><br>दिपक रणजितसिंग परिहार | समजपत्रावर मुक्त | समजपत्रावर मुक्त | भा.दं.वी. चे कलम २९४, ५०६ सह ३४ अन्वये. | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. | काही नाही | लागु नाही |

## <u>न्यायनिर्णय</u>
## (घोषित दिनांक : २४ जुलै, २०२६)

आरोपींविरूध्द भारतीय दंड विधान संहितेचे कलम २९४, ५०६ सह कलम ३४ अन्वयेच्या दंडनीय अपराधाकरीता दोषारोप ठेवण्यात आले आहे.

**२.** अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दि.०५.०५.२०१७ रोजी फिर्यादी संजय पडोळे यांनी पोलिस ठाणे शिरजगाव कसबा येथे लेखी फिर्याद नोंदविली की, त्याचे प्रमिलाबाई रणजितसिंग परिहार (आ.क्र.१) आणि दिपक रणजीतसिंग परिहार (आ.क्र.२) यांचे विरूध्द दिवाणी स्वरूपाचे प्रकरणे न्यायालयात सुरू होते. तथापि, फिर्यादीचे घराचे बांधकामाच्या बाबत दिवाणी न्यायालयाने मनाई हुकुमाचे आदेश नाकारल्याने फिर्यादीने त्याचे घराचे बांधकामाची सुरूवात केली. दि.०५.०५.२०१७ रोजी सकाळी १० वाजता फिर्यादी घराचे कामकाज करत असताना (आ.क्र.१) ही तिथे आली व म्हणु लागली की,

"मादरचोदा तु लय माजला, बांधकाम सुरू केलस तुझा मुडदा पाडतो." तेवढ्यात आ.क्र.२ हे फिर्यादीचे अंगावर कुऱ्हाड घेउन जीवे मारण्यास आला त्यावेळी चेतन मनोहरे (सा.क्र.४) याने मध्यस्थी करून वाद संपवला. सबब, घडलेल्या घटनेबाबत पोलिस ठाणे शिरजगाव कसबा येथे फिर्यादी नोंदविण्यात आली.

**३.** फिर्यादीने दिलेल्या रिपोर्टच्या अनुषंगाने दि. ०६.०५.२०१७ रोजी पोलिस ठाणे शिरजगाव कसबा येथे गुन्हा क्र. १४१/१७ नुसार भा.दं.वि. कलम २९४ आणि ५०६ सह ३४ अन्वये आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला.

**४.** आरोपींविरूध्द भारतीय दंड विधान संहितेचे कलम २९४ आणि ५०६ सह ३४ अन्वयेच्या दंडनीय अपराधाकरीता निशानी क्र.१२ प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आले. आरोपींनी आपले प्रतीकथनात आरोप नाकारुन सुनावणीची मागणी केली. सबब, संपरीक्षा पुढे चालविण्यात आली. संपरिक्षेदरम्यान आरोपीविरुध्द मिळुन आलेल्या पुराव्या संदर्भात स्पष्टीकरण देण्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) अन्वये अभिप्रेत असलेले आरोपीचे निवेदन नि.क्र.३५ व ३६ अन्वये नोंदविण्यात आले.

**५.** माझ्या विचारार्थ निघालेले विचाराधीन प्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे :-

| **अ.क्र.** | **विचाराधीन प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | आरोपींनी संगणमताने सार्वजनिक ठिकाणी अश्लील शब्द अथवा भाषेचा प्रयोग करून त्याचा फिर्यादीस अथवा इतरांना त्रास होईल असे कृत्य केले, असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **...नाही.** |
| **२.** | आरोपींनी संगणमताने फिर्यादीला मारण्याची धमकी दिली, असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **...नाही.** |
| **३.** | काय आदेश? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**विचाराधीन प्रश्न क्र.१ व २ च्या बाबतीत :-**

**६.** आरोपींविरूध्द भा.दं.वि. कलम २९४ आणि ५०६ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले आहे. सदर कलमांचा विचार करता भा.दं.वि. २९४ अन्वये आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने खालील बाबी सिध्द करणे आवश्यक आहे.

अ) फिर्यादीने अश्लील भाषेचा शब्द प्रयोग केला,

ब) सदर शब्दप्रयोग हा सार्वजनिक ठिकाणी केला,

क) सदर शब्दप्रयोग इतरांना त्यांचा त्रास झाला.

तसेच भा.दं.वि. कलम ५०६ अन्वये गुन्हा सिध्द करण्याकरिता आरोपीने फिर्यादीस धमकी दिली हे सिध्द करणे आवश्यक आहे. सदर बाबी या संशयापलिकडे सिध्द करणे हे अभियोग पक्षाचे कर्तव्य आहे.

**७.** उपरोक्त बाबी सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने एकुण ६ साक्षीदार तपासले असुन सदर साक्षीदारांच्या तोंडी पुराव्यावर तसेच सदर साक्षीदारांच्या मार्फत सिध्द केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरून अभियोग पक्ष विसंबुन आहे.

८. अभियोग पक्षाने संजय पडोळे (सा.क्र.१) यांना तपासले असता त्यांनी सरतपासात सांगितले की, दोन्ही आरोपी हे त्याचे घराशेजारी राहतात. त्याचा पुरावा नोंदविल्यापासुन २ ते ३ वर्षापुर्वी त्याचे घरी सकाळी १० वाजता घराच्या पायाचे काम सुरू असतांना दोन्ही आरोपी त्याच्या घरी आले. आरोपींनी त्याचे घरी बांधकाम रोखुन शिवीगाळ केली. दिपक (आ.क्र.२) यांनी त्यास "काम बंद करो नही तो काट डालेंगे" असे म्हटले. त्यानंतर त्याने पोलिस ठाणे शिरजगाव कसबा येथे रिपोर्ट (नि.क्र.१७) नोंदविले त्यातील मजकुर खरा असल्याचे सदर साक्षीदार सांगतात व त्यावरील सही देखील ओळखली. तसेच, सदर रिपोर्टच्या अनुषंगाने छापील प्रथम खबरी अहवालावर देखील त्याची सही असल्याचे ते सांगतात. सदर साक्षीदार हेही सांगतात पोलिस त्याचेकडे चौकशी करिता आले होते मात्र कोणतीही कार्यवाही केली नव्हती व त्याचे बयाण देखील नोंदविले नव्हते.

९. उलटतपासात सदर साक्षीदार मान्य करतात की, त्याचे घर हे सार्वजनिक ठिकाणाजवळ नाही. तथापि, आरोपींनी त्यास घरी येउन शिवीगाळ केली नाही तरीदेखील त्याचेविरूध्द खोटी रिपोर्ट नोंदविल्याचे उत्तरसुचक प्रश्नास ते नकारात्मक उत्तरे देतात.

१०. सा.क्र.२ मोतीलाल पारवे यांना अभियोग पक्षाने घटनास्थळ पंच या नात्याने तपासले. ते सरतपासात सांगतात की, दि.०७.०५.२०१७ रोजी पोलिस त्यांना फिर्यादीचे घरासमोर बोलावुन घटनास्थळाचा पंचनामा तयार केला व तो त्यास वाचुन दाखविला. सदर पंचनामा हा आरोपी व फिर्यादीमध्ये झालेल्या भांडणाविषयी असल्याचे सांगुन सदर साक्षीदार सदर पंचनामा नि.क्र.२२ वरील त्याची सही देखील ओळखतात.

११. उलटतपासात सदर साक्षीदार देखील मान्य करतात की, फिर्यादीच्या घराच्या आजुबाजुची जागा ही सार्वजनिक ठिकाण नाही. तसेच, पोलिसांनी त्याला पंचनाम्याकरिता कोणतीही लेखी सुचना न दिल्याचे सदर साक्षीदार मान्य करतात. तसचे पंचनामा पुर्वीपासुन लिहुन ठेवला आहे व पोलिसांनी त्यांच्यासमक्ष पंचनामा केला नाही असे देखील सदर साक्षीदार उलटतपासात मान्य करतात.

१२. सा.क्र.३ सविता ही फिर्यादीच्या पत्नी आहे. त्या सरतपासात सांगतात की, दि.०५.०५.२०१७ रोजी सकाळी १० वाजता त्याचे घरासमोर प्रेमिलाबाई ही तिचे पतीला शिवीगाळ करत म्हणाले की, "मादरचोदा तुझा मुडदा पाडतो." त्यानंतर आ.क्र.२ चा मुलगा दिपक (आ.क्र.१) हा कुऱ्हाड घेउन तिचे पतीला मारण्यास आला. त्यावेळी चेतन मनोहरे याने दिपकच्या हातातील कुऱ्हाड हिसकावुन त्याला त्याचे घरी घेउन गेला व तदनंतर, तिचे पतीने पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली. उलटतपासात सदर साक्षीदार सांगतात की, तिचे घराच्या पुर्व बाजुस घराचा बाहेर पडण्याचा रस्ता आहे. तथापि, तिचे घराचे आजुबाजुला सार्वजनिक ठिकाण नसल्याचे ती नाकरते.

१३. सा.क्र.४ चेतन मनोहरे हे सरतापासात सांगतात की, दि.०५.०५.२०१७ रोजी १० वाजताच्या सुमारास संजय पडोळे याच्या घराजवळ ते उपस्थित असताना आ.क्र.१ ने

फिर्यादीला शिवीगाळ केली की, “मादरचोदा तु काय माजला आहेस, घराचे बांधकाम करतो, थांब तुझा मुडदा पाडतो". त्याचवेळेस, आ.क्र.२ कुऱ्हाड घेउन फिर्यादीचे अंगावर आला. त्याने आरोपीला पकडुन त्याचे घरी सोडले व तदनंतर संजय याने पोलिस ठाण्यात रिपोर्ट नोंदविला होता.

**१४.** उलटतपासात सदर साक्षीदार मान्य करतात की, आरोपींना मराठी भाषा बोलता येत नाही व ते हिंदी भाषेत बोलतात. याशिवाय, बचाव पक्षातर्फे विचारलेल्या खोटी साक्ष देत असल्याच्या उत्तरसुचक प्रश्नाना सदर साक्षीदार नकारात्मक उत्तरे देतात.

**१५.** सा.क्र.५ हफिज खाँ हे घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच असुन ते अभियोग पक्षास सहाय्य करत नाहीत.

**१६.** प्रस्तुत प्रकरणातील तपासी अधिकारी ए.एस.आय. सुनिल पारवे (आ.क्र.६) हे सरतपासात सांगतात की, दि.०६.०५.२०१७ रोजी त्यांना दाखल गुन्ह्याचा तपास प्राप्त झाल्यावर त्यांनी खरपी येथे फिर्यादी योन दाखविलेले सार्वजनिक रस्त्याच्या बाजुचे ठिकाणाचा २ पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. तदनंतर, फिर्यादी आणि साक्षीदाराचे बयाण नोंदवुन आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले होते. सदर घटनास्थळ हे सार्वजनिक रस्त्याच्या बाजुचे स्थळ होते असे सदर साक्षीदार सांगतात.

**१७.** उलटतपासात फिर्यादीने दाखविलेले स्थळ हे सार्वजनिक ठिकाण नाही अशा उत्तरसुचक प्रश्नाना ते नकारात्मक उत्तरे देतात. फिर्यादी आणि आरोपी यांच्यातील दिवाणी वादाबाबत चौकशी केली नसल्याचे ते उलटतपासात मान्य करतात. तथापि, बनावट तपास करून खोटे दोषारोपपत्र दाखल केल्याच्या उत्तरसुचक प्रश्नांना ते नकारात्मक उत्तरे देतात.

**१८.** सदर तोंडी व लेखी पुराव्यांच्या आधारे आरोपीवर ठेवण्यात आलेले दोषारोपपत्र अभियोग पक्षाने सिध्द केल्याचा दावा करत सहाय्यक सरकारी वकील श्रीमती प्रतिभा खंडारे यांनी न्यायालयाल युक्तीवाद सादर केला की, प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी, तिचे पती (सा.क्र.३), (सा.क्र.४) हे घटनेविषयी समान पध्दतीने सांगतात. फिर्यादीने दाखल केलेल्या

लेखी फिर्यादी व प्रथम खबरी अहवाल हा निर्विवादपणे सिध्द झाला असुन स्वतंत्र सा.क्र.४ हे देखील अभियोग पक्षास सहाय्य करतात. स्वतंत्र पंच देखील हे मान्य करतात की, घटनास्थळ हे फिर्यादीच्या घरासमोरील जागा होती. त्यामुळे, आरोपींनी संगणमताने गुन्हा केल्याचे अभिलेखावरील पुराव्यावरून सिध्द होते. त्यामुळे, आरोपींना कायद्यान्वये कठोर शासन होण्याची विनंती सरकारी पक्षातर्फे करण्यात आली.

**१९.** आरोपींतर्फे ॲड. श्री. एन.एच.पाटील यांनी युक्तीवाद केला की, भा.दं.वि. कलम २९४ अन्वये अश्लील शिवीगाळ ही सार्वजनिक ठिकाणी होउन त्याचा इतरांना त्रास होणे हे सदर गुन्हयाचे प्रमुख घटक आहेत. मात्र घटनेत केलेली कथित शिवीगाळ वेगवेगळया पध्दतीने सांगतात. तसेच, घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाण नसल्याचे फिर्यादी व स्वत: घटनास्थळ पंच सांगतात. सा.क्र.१, ३ व ४ यांनी कथन केलेले कथित शिवीगाळीमध्ये सुसंगती आढळुन येत नाही. तसेच, आरोपींनी फिर्यादीस कुऱ्हाडीच्या साहाय्याने धमकी दिल्याचे जरी साक्षीदार सांगत असले तरी अशी कोणतीही कुऱ्हाड प्रस्तुत गुन्हयात जप्त करण्यात आली नाही. अभिलेखावरील अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा साशंकतेच्या पलिकडे सिध्द होत नसल्याने आरोपींना निर्दोष मुक्त करण्याची विनंती बचाव पक्षातर्फे करण्यात आली.

**२०.** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले.

**२१.** सा.क्र.१ संजय याच्या पुराव्यातुन हे सिध्द होते की, दि.०६.०५.२०१७ रोजी त्यांना दाखल केलेल्या रिपोर्टच्या अनुषंगाने पोलिस ठाणे शिरजगाव कसबा येथे अपराधाची नोंद देण्यात आली होती. तथापि, सदर रिपोर्टमधील कथनांची सतत्या ही पुराव्याच्या आधारे पडताळणे आवश्यक आहे. फिर्यादीच्या सरतपासात त्यांनी आ.क्र.२ ह्याच्या हातात कुऱ्हाड होती असे म्हटले नाही. तथापि, त्याचे घर सार्वजनिक ठिकाणाजवळ नाही असे देखील ते उलटतपासात मान्य करतात. अश्लील शब्दांचा वापर करून त्यांना शिवीगाळ झाली असे देखील ते सरतपासात सांगत नाही. सबब, कुऱ्हाडीचा वापर, अश्लील शिवीगाळ व सदरचे कृत्य हे सार्वजनिक ठिकाणाजवळ झाले नाही याबाबत फिर्यादीच्या सरतपासात आणि मुळ फिर्यादीत विसंगती आढळुन येते.

२२.		घटनास्थळ पंच – सा.क्र.२ हे देखील घटनास्थळ सार्वजनिक ठिकाणाजवळ नसल्याचे कथन करतात. त्यामुळे, घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाणी आहे अगर कसे याबाबत साशंकता निर्माण होते.

२३.		फिर्यादीच्या पत्नी सा.क्र. ३ सविता या कथन करत असलेल्या शिवीगाळ या फिर्यादीने सांगितलेल्या शिवीगाळीशी सुसंगत ठरत नाहीत. सबब, घटनेच्याबाबत साक्षीदाराच्या पुराव्यात विसंगती आढळुन येते.

२४.		प्रस्तुत प्रकरणात घटनास्थळ हे सर्वाजनिक ठिकाण असल्याबाबत संयुक्तिक पुरावा अभिलेखावर आणण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला. स्वत: फिर्यादी व घटनास्थळ पंच हे मान्य करतात की, घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाणाच्या जवळ नव्हते अथवा सार्वजनिक ठिकाण देखील नव्हते. त्यामुळे घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाण असल्याची बाजु अधिक बळकटपणे सिध्द करणे हे अभियोग पक्षाचे कर्तव्य ठरते. केवळ तपासी अधिकारी यांनी सरतपासात सांगितले की, घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाणाच्या जवळ होते हे पुरेसे ठरत नाही. याउलट, जवळ असलेले ठिकाण हे नक्की कोणत्या स्वरूपाचे स्थळ होते व ते सार्वजनिक ठिकाणाच्या परिकक्षेत कसे मोडते हे दर्शविणे अभिप्रेत आहे. सदर मुलभुत बाब सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरतो.

२५.		याशिवाय, सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ केल्यामुळे इतरांना त्याचा त्रास झाला व सदर शिवीगाळ ही अभद्र अथवा अश्लील स्वरूपाची होती हे सिध्द करणे देखील अभियोग पक्षाचे कर्तव्य आहे. तथापि, साक्षीदारांनी कथन केलेल्या शिवीगाळीच्या वर्णनात विसंगती आढळुन येते. तसेच, त्याचा इतरांना त्रास झाला, याबाबत देखील अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्यात साक्षीदारांची अनभिज्ञता दिसुन येते. सबब, भारतीय दंड विधान कलम २९४ अन्व्ये दंडनीय अपराध संशयापलिकडे सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरतो.

२६.		प्रस्तुत प्रकरणात आ.क्र.२ याने फिर्यादी यास कुऱ्हाडीच्या साहाय्याने धमकी दिल्याचे अभियोग पक्षाचे म्हणणे आहे. तथापि, स्वत: फिर्यादीच हा त्याच्या सरतपासात

कुऱ्हाडीचे वर्णन करत नाही. कथित कुऱ्हाड ही तपासी अधिकारी यांनी जप्त केली नाही. धमकी बाबतचा उल्लेख देखील प्रत्येक साक्षीदार वेगवेगळया पध्दतीने सांगतात व त्यामध्ये सुसंगती आढळुन येत नाही. सबब, भारतीय दंड विधान कलम ५०६ अन्व्ये ठेवण्यात आलेले दोषारोप संशयापलिकडे सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरतो.

२७. फिर्यादी व आरोपी यांचेत दिवाणी स्वरूपाचा वाद असल्याची बाब अभिलेखावर मांडण्यात आली आहे. पुर्वीचे वाद दुधारी शस्त्र असुन ते एका बाजुने गुन्हा करण्याचा उद्देश दाखविते. दुसऱ्या बाजुने चुकीच्या पध्दतीने गुन्हयात गोवण्याचा संशय देखील दर्शविते. अशा परिस्थितीत ज्यावेळेस घटनेविषयी दोन दृष्टीकोन संभव असतील त्यावेळी आरोपीच्या हिताचा दृष्टीकोन स्वीकारणे ही बाजु न्याय शास्त्राचे नियम आहे. अशा परिस्थीतीत संशयाच्या आधारे आरोपींच्या हिताचा दृष्टीकोन बाळगणे न्यायोचित ठरेल. परिणामी, विचाराधीन प्रश्न क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

**<u>विचाराधीन प्रश्न क्र. ३ करिता :</u>**

२८. आरोपीविरूध्द भा.दं.वि कलम २९४ आणि ५०६ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले होते. परंतु, उपरोक्त करणास्तव आरोपींविरूध्द सदर आरोप संशयापलिकडे सिध्द करण्यास अभियोग पक्षास अपयश आल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे, आरोपीची सदर आरोपातुन निर्दोष मुक्तता करणे आवश्यक आहे. सबब, विचाराधीन प्रश्न क्र. ३ चे उत्तर देण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येते.

## <u>आदेश</u>

१. **आरोपी क्र.१ प्रमिलाबाई रणजितसिंग परिहार आणि आरोपी क्र.२ दिपक रणजितसिंग परिहार** यांची भारतीय दंड संहिता,१८६० च्या कलम २९४, ५०६ नुसार गुन्हा केल्याच्या आरोपांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेसाठी बंधपत्र व जामीन दयावी व त्यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७(अ) नुसार आजपासुन सहा महिन्यानंतर रद्द समजण्यात यावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

**सही/-**
**(एच. एस. सोनार)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी
(न्या.क्र.३), चांदुर बाजार.

**दिनांक :** २४/०७/२०२६

## भाग क

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ) अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी**

| | | |
|---|---|---|
| १. | साक्षीदार क्र. १ संजय आनंदराव पडोळे | फिर्यादी |
| २. | साक्षीदार क्र. २ मोतीलाल रामलाल पारवे | घटनास्थळ पंच |
| ३. | साक्षीदार क्र. ३ सविता संजय पडोळे | घटनास्थळ पंच |
| ४. | साक्षीदार क्र. ४ चेतन दानिलाल मनोहरे | साक्षीदार |
| ५. | साक्षीदार क्र. ५ हफिजखॉं साहेबखॉं | घटनास्थळ पंच |
| ६. | साक्षीदार क्र. ६ सुनिल श्रीरंग पवार | तपासी अधिकारी |

**ब) बचावाचे साक्षीदार** – नाही.

**क) न्यायालयीन साक्षीदार** – नाही.

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी**

**अ) अभियोग पक्ष न्यायालयीन निशाणी–**

| **क्र.** | **तपशील** | **निशाणी** |
|---|---|---|
| १. | नि.क्र.१७ व १८/सा.क्र.०१ | रिपोर्ट व प्रथम खबरी अहवाल |
| २. | नि.क्र.२२/सा.क्र.०२ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | नि.क्र.२९/सा.क्र.०५ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |

**ब) बचावपक्ष निशाणी** – काही नाही

**क) न्यायालयातर्फे निशाणी** – काही नाही.

**ड) सामग्री वस्तु :** – काही नाही.

**सही/-**
**(एच. एस. सोनार)**

**दिनांक :** २४/०७/२०२६

प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी
(न्या.क्र.३), चांदुर बाजार.

न्या.दं.प्र.श्रे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Shri. U. U. Mugal |
| Name of Court | 2nd Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Chandur Bazar. |
| Date of Dictation | 24/07/2026 |
| Judgment/order signed by the PO on | 24/07/2026 |
| Judgment/order uploaded on | 24/07/2026 |

न्या.दं.प्र.श्रे.